# जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.

## -: दरपत्रक सुचना :-

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा अंतर्गत न्यायालय/विभागासाठी खालीलप्रमाणे विदयुत साहित्याची आवश्यकता असल्यामुळे खालीलप्रमाणे विदयुत साहित्याची आवश्यकता खरेदी करावयाची आहे. त्यानुसार स्थानिक बाजारातील विक्रेत्यांना/संस्थेला सुचित करण्यात येत आहे की, ज्यांना खालील वस्तुचे/साहित्याचे 'दरपत्रक' दाखल करावयाच्या असतील, त्यांनी 'दरपत्रक' सिलबंद लिफाफ्यामध्ये जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील कार्यालयात दि. ०३/०५/२०२४ ला सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत न चुकता सादर करावेत तसेच दरपत्रक लिफाप्यावर **'विदयुत साहित्याचे दरपत्रक'** असे ठळक अक्षरात लिहावे.

| अ.क्र. | विदयुत साहीत्य | परीमाण |
|---|---|---|
| १ | टी-५ एलईडी टयुबलाईट २० वॅटचे (गॅरंटी/वारंटीसह) | प्रती नग |
| २ | टयूबलाईट चोक | प्रती नग |
| ३ | टयूबलाईट स्टार्टर | प्रती नग |
| ४ | फॅन कॅपेसीटर | प्रती नग |

**स्वा./-**
**(संजय भारूका)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,**
**वर्धा.**

दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :

१) दरपत्रकावर "विदयुत साहित्याचे दरपत्रक" असे ठळक अक्षरात लिहावे तसेच दरपत्रक पाठवणाऱ्या संस्थेचे/पुरवठादराचे/व्यक्तीचे नाव, पत्ता व मोबाईल नंबर स्पष्ट ओळखता येईल अशा प्रकारे लिहावे.

२) वेळेनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

३) दरपत्रकामध्ये दर्शवल्याप्रमाणेच प्रती नग, परिमाणात दर्शवल्याप्रमाणेच दर नमुद करावे.

४) दरपत्रकातील दर हा सर्व करांसह नमुद असलेले दराचा उल्लेख करावा.

५) दरपत्रक मंजुर किंवा नामंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा अंतर्गत गठीत स्थानिक खरेदी समितीला राहिल.

६) दरपत्रकातील एखादया वस्तुचा दर्जा पाहण्याची आवश्यकता भासल्यास त्या वेळी सादर करावे लागेल.

७) दरपत्रकातील नमुद दराप्रमाणेच वस्तुंचा/साहित्याचा पुरवठा करावा लागेल.

८) साहित्याचा पुरवठा आदेश दिल्यानंतर साहित्य जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे स्वत :च्या खर्चाने (दरपत्रक मंजुर झालेला संस्थेला/व्यक्तीला/विक्रेत्यास) आणुन दयावे लागेल. त्याबाबत या कार्यालयामार्फत कोणताही वाहतुकीचा इ. खर्च दिला जाणार नाही.

९) दरपत्रकात नमुद केलेल्या साहित्याची वॉरंटी/गॅरंटी तसेच कंपनीचे नाव, साइज याबाबत सविस्तर माहिती दरपत्रकात नमुद करावी.

१०) दरपत्रकातील दराप्रमाणेच वस्तुचा आदेशाप्रमाणे व दरपत्रकातील दराप्रमाणे प्राप्त झाल्याची खात्री झाल्यानंतरच सदर वस्तुच्या देयकाबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

पृष्ठांकण क्र.१८३६/रो.व.वि.वि./२०२४.
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.
दिनांक :२४/०४/ २०२४.

प्रतीलीपी: माहीती व योग्य कार्यवाहीस अग्रेषित
१) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
२) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३) जिल्हा परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४) तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५) सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६) नगर परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
७) जिल्हा संगणक प्रणाली, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्दिकरीता.

२४.४.२४

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा.